# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-15.06.2026** **वार- सोमवार**

---

**अधिवेशन**

राज्य विधिमंडळाच आगामी पावसाळी अधिवेशन येत्या २२ जून ते १० जुलै या कालावधीत मुंबईत होणार आहे. आज झालेल्या कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. विधानसभा आणि विधान परिषदेच्या कामकाजासंदर्भात झालेल्या स्वतंत्र बैठकींमध्ये हा निर्णय घेण्यात आला. तीन आठवड्यांच्या अधिवेशनाच्या कालावधीत अनेक महत्त्वाची विधेयकं, जनहिताचे प्रश्न आणि शासकीय कामकाज पूर्ण करण्याचं नियोजन करण्यात आलं आहे. राज्यातील शेतकऱ्यांचे प्रश्न, कर्जमाफीचे विषय चर्चेला येण्याची शक्यता आहे. तसंच, महिला शेतकऱ्यांना स्वतंत्र ओळख देणार महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयकही मांडलं जाणार आहे.

**मोहोळ**

केंद्रीय सहकार आणि नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी आज पुण्यात पत्रकार परिषद घेऊन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या गेल्या १२ वर्षांच्या कार्याचा लेखा जोखा मांडला. जन-धन, उज्ज्वला, पीएम आवास यासारख्या लोकोपयोगी योजना राबवत, पायाभूत सुविधांमध्ये झालेल्या वाढीमुळे नगरिकांचं आयुष्य अधिक सुलभ झाल्याचं ते म्हणाले. पुणे शहरातील मेट्रो प्रकल्पाचं विस्तारीकरण, पुणे विमानतळाचं विस्तारीकरण, १ हजार ई-बसेसना मंजूरी आदि पुण्यासाठी घेतलेल्या निर्णयांचा त्यांनी विशेष उल्लेख केला. गेल्या १२ वर्षांत देशांत पारदर्शी आणि लोकाभिमुख प्रशासन आल्याचं ते यावेळी म्हणाले.

**प्रवेशोत्सव**

उन्हाळी सुट्ट्या संपवून नवीन शैक्षणिक वर्षाला आजपासून सुरुवात झाली. या निमित्तानं पुणे शहर आणि जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये आज प्रवेशोत्सव साजरा करण्यात आला. नवीन शैक्षणिक वर्षात, नव्या वर्गात पाऊल ठेवणाऱ्या लहानग्यांचं जल्लोषात स्वागत करण्यात आलं. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी मावळ तालुक्यातील पीएम श्री आदर्श केंद्र जिल्हा परिषद शाळेतील प्रवेशोत्सवामध्ये सहभागी होत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. प्रत्येक शाळेत डिजिटल क्लासरूम, दर्जेदार पाठ्यपुस्तकं आणि आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच क्रीडा क्षेत्रात यश संपादन करावं, यासाठी प्रत्येक तालुक्यात चांगली क्रीडांगणं उभारली जात आहेत, असं पवार यांनी यावेळी सांगितलं.

**भीमाशंकर मंदिर**

श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर आजपासून दर्शनासाठी खुलं झालं आहे. दुरुस्तीच्या कामांसाठी गेल्या काही दिवसांपासून मंदिर भाविकांना दर्शनासाठी बंद ठेवण्यात आलं होतं. आजपासून दररोज मंदिरात एक हजार भाविकांना प्रवेश दिला जाणार आहे. त्यासाठी दर्शन पास अनिवार्य करण्यात आल्याचे जिल्हा प्रशासनानं कळवलं आहे. भाविकांनी मंदिर व्यवस्थापन समितीच्या https://shreebhimashankar.com या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी केल्यानंतर पास मिळेल.

**अमलीपदार्थ**

अंमली पदार्थ विरोधी कृती दल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि स्वयंसेवी संस्थांनी, अंमली पदार्थ विरोधी जनजागृतीसाठी स्पर्धा आयोजित केल्या आहेत. केंद्र सरकारच्या नशामुक्त भारत अभियानाला मध्यवर्ती ठेवून देशभर जनजागृतीसाठी व्यापक उपक्रम राबवले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून “अंमली पदार्थांचे दुष्परिणाम” या विषयावर घोषवाक्य, निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा आणि रील तयार करण्याची स्पर्धा होणार आहे. येत्या 21 जून पर्यंत या स्पर्धेसाठी विनामूल्य नाव नोंदणी करता येईल. स्पर्धेबाबत अधिक माहितीसाठी अंमली पदार्थ विरोधी कृती दलाच्या जनसंपर्क अधिकाऱ्यांशी किंवा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या NSS विभागाशी संपर्क साधावा. सर्व वयोगटातील विद्यार्थी आणि जागरूक नागरिकांनी या राज्यव्यापी स्पर्धेत मोठ्या संख्येनं सहभागी व्हावं असं आवाहन विशेष पोलीस महानिरीक्षक ज्योतीप्रिया सिंग यांनी केलं आहे.

**परिषद**

येवलेवाडी इथल्या केजे एज्युकेशनल इन्स्टिट्यूट्सतर्फे पुण्यात, १७ ते १९ जून दरम्यान, ‘इग्नाईट २०२६’ ही आंतरराष्ट्रीय परिषद होणार आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कल्याण जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत याबाबत माहिती दिली. यामध्ये संशोधक, प्राध्यापक, उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ, नवोन्मेषक एकत्र येऊन अभियांत्रिकी, नवोपक्रम आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानांवर विचार मंथन करणार आहेत.

**चित्रपट महोत्सव**

‘चित्रभारती २०२६’ या लघुपट महोत्सवात, डॉ. ज्ञानेश्वर जाधवर दिग्दर्शित ‘कूस’ या लघुपटाने सर्वोत्कृष्ट लघुपटाचा मान पटकावला. डॉ. जाधवर यांना सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक पुरस्कार, तर अभिनेत्री अनुया कळसकर यांना सर्वोत्कृष्ट अभिनेत्री पुरस्काराने गौरवण्यात आलं. प्रभात चित्र मंडळ, रोटरी क्लब ऑफ ठाणे एसेस आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठाननं या महोत्सवाचं आयोजन केलं होतं. मुंबईत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानमध्ये हा महोत्सव झाला; त्यानंतर ठाण्यातील गडकरी रंगायतन इथं मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचं वितरण झालं. बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर महिलांचं श्रमजीवन, आरोग्यविषयक समस्या यांचं वास्तववादी चित्रण ‘कूस’ या लघुपटातून करण्यात आलं आहे.

**सत्कार**

आपल्या कार्यकर्तृत्वाने पिंपरी चिंचवड शहराच्या नावलौकिकात मोलाची भर घालणाऱ्या मान्यवरांचा सन्मान महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत केला जातो. आज झालेल्या सर्वसाधारण सभेत आंतरराष्ट्रीय कीर्तिचे कथक नर्तक डॉ. पंडित नंदकिशोर कपोते यांचा महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल ३५ पूर्णांक २ तर किमान २५ अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू, विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांत मध्ये. नमस्कार.**